सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५

(१५ सप्टेंबर, २०१५ पर्यंत सुधारित)

*MAHARASHTRA ACT No. XLVI OF 1965*

# MAHARASHTRA MEDICAL COUNCIL ACT, 1965

*(As modified up to 15th Sept., 2015)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित
२०१५

[ किंमत रु.      ]

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५

अनुक्रमणिका

**उद्देशिका**

कलमे


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ
२. व्याख्या

प्रकरण दोन

**परिषदेची घटना, कामे व अधिकार**

३. परिषदेची घटना व तिचे कायद्याने संस्थापन
४. पदावधी
५. नैमित्तिक रिक्त जागा
६. राजीनामा
७. निरर्हता आणि असमर्थता
८. परिषदेच्या सभा
९. सभांतील कामकाज व कृतींची विधिग्राह्यता
१०. परिषदेचे अधिकार, कर्तव्ये व कामे
११. कार्यकारी समिती
१२. परिषदेच्या व कार्यकारी समितीच्या सदस्यास द्यावयाची फी व भत्ते
१३. परिषदेचे उत्पन्न व खर्च
१४. परिषदेच्या प्रबंधकाची नेमणूक, त्याची कर्तव्ये व कामे
१५. परिषदेचे इतर कर्मचारी

प्रकरण तीन

**नोंदवही तयार करणे व ठेवणे**

१६. नोंदवही तयार करणे
१७. विवक्षित बाबतीत नोंदणी करण्यासाठी विशेष कार्यपद्धती
१८. ज्यांची नोंदणी करता येणार नाही अशा व्यक्ती
१९. तात्पुरत्या नोंदणीकरिता फी आणि तात्पुरत्या नोंदणीसंबंधी प्रमाणपत्र
२०. नोंदवही ठेवणे
२१. नोंदणीकृत व्यवसायींची सूची प्रसिद्ध करणे
२२. नोंदवहीतून नाव काढून टाकणे
२३. नोंदणीचे नवीकरण

कलमे

२४. अपिले

२५. नोंदणीकृत व्यवसायींचे हक्क

२६. वैद्यक व्यवसायींना लागू असलेल्या सर्वसाधारण तरतुदी

प्रकरण चार

**संकीर्ण**

२७. परिषदेस माहिती मागविण्याचा व परीक्षेस उपस्थित राहण्यास फर्मावण्याचा अधिकार असणे

२८. अनुसूचीची दुरुस्ती

२९. नोंदणी केली आहे असे खोटे सांगितल्याबद्दल शास्ती

३०. नियम

३१. राज्य शासनाचे नियंत्रण

प्रकरण पाच

**निरसन व संक्रमणकालीन तरतुदी**

३२. निरसन व व्यावृत्ती

३३. निरसित अधिनियमांखाली घटित करण्यात आलेल्या परिषदा विसर्जित करणे आणि नवीन परिषद घटित करणे

३४. प्रबंधकांसंबंधीची तरतूद

३५. अधिकार, कर्तव्ये, वगैरे निहित करणे

३६. अडचणी दूर करण्याचा अधिकार

अनुसूची

## [ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६[१] ]

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५

[ या अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर तो, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग पाच, दिनांक २५ नोव्हेंबर, १९६५ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. ]

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.*

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९$#(१४-०१-२००२).**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५(१०-०२-२००४).**@

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९(१४-०१-२००५).**

**महाराष्ट्र राज्यात आधुनिक शास्त्रीय वैद्यक व्यवसाय करणा-या व्यक्तींच्या नोंदणीचे विनियमन करणा-या कायद्यांचे एकीकरण व एकत्रीकरण करण्याबाबत आणि त्यात अधिक चांगली तरतूद करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात आधुनिक शास्त्रीय वैद्यक व्यवसाय करणा-या व्यक्तींच्या नोंदणीचे विनियमन करणा-या कायद्याचे एकीकरण व एकत्रीकरण करणे आणि त्यात अधिक चांगली तरतूद करणे आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५, असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल ; आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमील त्या दिनांकाला अंमलात येतील.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(अ) "नेमलेला दिवस" याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम १, पोट-कलम (३) अन्वये कलम १ खेरीज इतर तरतुदी ज्या दिनांकास अंमलात येतील तो दिनांक, असा आहे ;

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासकीय राजपत्र, १९६५, भाग ५, असाधारण, पृष्ठे ३११-३१२ इंग्रजी पहा.

* सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याचे कलम ५ पुढीलप्रमाणे वाचावे :—

"५. कलम ३, खंड (ब) मधील कोणत्याही मजकुरामुळे, हा अधिनियम अंमलात येण्याच्या लगतपूर्वी रचना करण्यात आलेल्या व काम करीत असलेल्या कोणत्याही कार्यकारी समितीच्या रचनेस बाध येणार नाही." व्यावृती.

$ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम ४ अन्वये महाराष्ट्र अध्यादेश २००२ चा क्रमांक सहा निरसित करण्यात आला.

# सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याचे कलम ३ पुढीलप्रमाणे वाचावे :—

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त कलम ३१ च्या पोट-कलम (१) अन्वये प्रशासक म्हणून दोन वर्षाच्या कालावधीकरिता नेमणूक करण्यात आलेल्या आणि हा अधिनियम अंमलात येण्याच्या लगतपूर्वी त्या पदावर असलेल्या व्यक्तीने, तो दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यापासून कलम ३१ च्या पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे शासनाने तिचा पदावधी वाढवून दिलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत केलेला अधिकाराचा कोणताही वापर किंवा पार पाडलेले कर्तव्य किंवा केलेली कार्ये ही, विधिग्राह्य असतील आणि ती नेहमीकरिता विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल ; आणि त्यांना कोणत्याही न्यायालयात आव्हान दिले जाणार नाही किंवा त्या व्यक्तीने, प्रशासक म्हणून अधिनियमान्वये, त्याच्या नेमणुकीच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यापासून कलम ३१ च्या पोट-कलम (१) च्या परंतुकान्वये तिचा पदावधी वाढवून दिलेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत कोणत्याही कायदेशीर प्राधिकाराशिवाय अधिकारांचा वापर केला होता, कर्तव्ये पार पाडली होती आणि कामे केली होती याच केवळ कारणावरून, अशा व्यक्तीविरूद्ध किंवा महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कार्यवाही दाखल केली जाणार नाही किंवा चालू करता येणार नाही. प्रशासकाने केलेल्या कृतींची किंवा गोष्टींची विधिग्राह्यता.

** ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ हा अधिनियम ६ फेब्रुवारी, २००४ रोजी अमलात आला. शासकीय अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक एमएसी २००२/सीआर-१४/०२/एसीटी, दिनांक ६ फेब्रुवारी, २००४ पहा.

(ब) “परिषद” याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली किंवा घटित केल्याचे समजण्यात येणारी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, असा आहे ;

(क) “कार्यकारी समिती” याचा अर्थ, परिषदेची कलम ११ अन्वये घटित करण्यात आलेली कार्यकारी समिती, असा आहे ;

(ड) “वैद्यक व्यवसायी” किंवा “व्यवसायी” या संज्ञेचा अर्थ, जी व्यक्ती, शल्यचिकित्सा व प्रसूतिशास्त्र या शाखांवरून, परंतु पशुवैद्यकीय चिकित्सा किंवा शल्यचिकित्सा किंवा आयुर्वेदीय, युनानी समचिकित्सा किंवा जीवरसायन वैद्यक पद्धती सोडून, आधुनिक शास्त्रीय वैद्यकातील कोणत्याही शाखेखाली व्यवसाय करीत असेल अशी व्यक्ती, असा आहे ;

(इ) “सदस्य” याचा अर्थ, परिषदेचा सदस्य, असा आहे ;

(फ) “विहित” याचा अर्थ, नियमाद्वारे विहित करण्यात आलेले, असा आहे ;

(ग) “अध्यक्ष” याचा अर्थ, परिषदेचा अध्यक्ष, असा आहे ;

(ह) “नोंदवही” याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेली किंवा तयार करण्यात आल्याचे समजण्यात येणारी व ठेवण्यात आलेली वैद्यक व्यवसायीची नोंदवही, असा आहे ;

(आय) “नोंदणीकृत व्यवसायी” या शब्दप्रयोगाचा अर्थ, नोंदवहीत त्या त्यावेळी ज्याचे नाव दाखल करण्यात आले असेल असा वैद्यक व्यवसायी, असा आहे ; परंतु, यामध्ये, ज्याचे नाव नोंदवहीत तात्पुरते दाखल करण्यात आले असेल अशा व्यक्तीचा समावेश होणार नाही ;

(ज) “प्रबंधक” याचा अर्थ, यथास्थिति, कलम ३४ किंवा कलम १४ अन्वये नेमण्यात आलेला प्रबंधक, असा आहे ;

(के) “नियम” याचा अर्थ, कलम ३० अन्वये केलेले नियम, असा आहे ;

(ल) “अनुसूची” याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची, असा आहे ;

(म) “उपाध्यक्ष” याचा अर्थ, परिषदेचा उपाध्यक्ष, असा आहे.

## प्रकरण दोन

## परिषदेची घटना, कामे व अधिकार

परिषदेची घटना व तिचे कायद्याने संस्थापन.

**३.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ‘ महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ’, या नावाची एक परिषद घटित करता येईल.

(२) अशी परिषद ही, एक कायद्याने संस्थापन केलेली संस्था असेल आणि तिची परंपरा अखंड असेल व तिची एक सामान्य मुद्रा असेल व तिला मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उपरोक्त नावाने तिला दावा लावता येईल तसेच त्या नावाने तिच्यावर दावा लावता येईल.

(३) परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

[1][(अ१) संचालक, आरोग्य सेवा-पदसिद्ध ;

(अ२) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन-पदसिध्द; ]

(अ) राज्य शासनाने नामनिर्दिष्ट करावयाचे पांच सदस्य ; यांपैकी एखादाच सदस्य हा, वैद्यक व्यवसायी नसला तरी चालेल ;

(ब) राज्यात कायद्याने स्थापन करण्यात आलेल्या व वैद्यकीय शाखा असलेल्या प्रत्येक विद्यापीठातील वैद्यकीय शाखेतील सदस्यांनी आपणामधून निवडून दिलेला वैद्यक व्यवसायी असलेला प्रत्येकी एक सदस्य ;

(क) मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाच्या नियामक मंडळातील सदस्यांनी आपणामधून निवडून द्यावयाचा, वैद्यक व्यवसायी असलेला एक सदस्य ; आणि

(ड) नोंदणीकृत वैद्यक व्यवसायांनी आपणामधून निवडून द्यावयाचे नऊ सदस्य.

(४) अध्यक्ष व उपाध्यक्ष हे, सदस्यांनी आपणामधून निवडून दिलेले असतील.

(५) सदस्य, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक ही, विहित करण्यात येईल अशा वेळी, अशा ठिकाणी आणि अशा रीतीने घेण्यात येईल.

(६) जर कोणत्याही निवडणुकीत, मतदारांनी आवश्यक त्या संख्येइतके सदस्य किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची निवड करण्यात कसूर केली असेल तर, राज्य शासन अशी एक किंवा अनेक रिक्त पदे भरण्यासाठी म्हणून, त्यास योग्य वाटेल अशा नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींस किंवा व्यवसायींना नामनिर्दिष्ट करेल आणि अशा रीतीने नामनिर्दिष्ट करण्यात आलेले वैद्यक व्यवसायी हे, या कलमान्वये रीतसर निवडून आले असल्याचे समजण्यात येईल.

(७) एखाद्या सदस्याच्या किंवा अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या कोणत्याही निवडणुकीच्या संबंधात एखादा विवाद उद्भवल्यास तो राज्य शासनाकडे निर्देशित करता येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ मधील अनुसूची द्वारे खंड (अ१) ऐवजी खंड (अ१) व (अ२) हे दाखल करण्यात आले.

**४.** (१) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, निवडून आलेल्या व नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सदस्यांची नावे प्रसिध्द करील. पदावधी.

(२) या अधिनियमात अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, सदस्य हा,— मग तो निवडून आलेला किंवा नामनिर्दिष्ट करण्यात आलेला असो,— पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या अवधीकरीता अधिकारपद धारण करील :

परंतु, ज्या बाबतीत विद्यापीठाच्या वैद्यकीय शाखेतील किंवा भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाच्या नियामक मंडळातील सदस्यांनी एखादी व्यक्ती निवडून दिली असेल त्याबाबतीत, जर ती, यथास्थिति, त्या शाखेत किंवा मंडळात असण्याचे बंद झाले असेल तर, ती सदस्य म्हणून अधिकारपद धारण करण्याचे बंद करील.

(३) या अधिनियमात अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, अध्यक्ष व उपाध्यक्ष हा, त्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून, सदस्य म्हणून त्याचा पदावधी ज्या दिनांकास संपत असेल त्या दिनांकापर्यंत पद धारण करील.

(४) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, मावळत्या सदस्यांचा पदावधी हा पोट-कलम (१) अन्वये ज्या दिवशी उत्तराधिकारी सदस्यांची नावे प्रसिध्द करण्यात येतील त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि त्या दिवशी संपत असल्याचे समजण्यात येईल.

(५) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मावळत्या अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा पदावधी यथास्थिति, अशा अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा उत्तराधिकारी ज्या दिवशी निवडण्यात येईल त्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आला असल्याचे आणि त्या दिवशी संपत असल्याचे समजण्यात येईल.

(६) मावळता सदस्य, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष पुन्हा निवडून येण्यास किंवा पुन्हा नामनिर्दिष्ट केला जाण्यास पात्र असेल.

(७) कोणत्याही सदस्यास परिषदेकडून सहा महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत अनुपस्थिती रजा देता येईल.

**५.** (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा कलम ३ याच्या पोट-कलम (३) चे खंड (ब), (क) किंवा (ड) अन्वये निवडून दिलेला सदस्य मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, तो निरर्ह ठरल्यामुळे किंवा तो असमर्थ झाल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे त्याचा पदावधी संपण्यापूर्वी त्याचे अधिकार पद नैमित्तिकरीत्या रिक्त झाले तर, असे कोणतेही अधिकारपद निवडणूक घेऊन भरण्यात येईल : नैमित्तिक रिक्त जागा.

परंतु, सर्व सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास संपत असेल त्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांमध्ये निवडून आलेल्या सदस्याचे अधिकारपद अशा रीतीने रिक्त झाले तर, ते भरण्यात येणार नाही.

(२) कलम ३, पोट-कलम (३) च्या खंड (अ) अन्वये नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सदस्याचे अधिकारपद त्याचा पदावधी संपण्यापूर्वी नैमित्तिकरीत्या रिक्त झाले तर, प्रबंधक, उक्त बाब राज्य शासनास ताबडतोब कळवील आणि त्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य शासन नामनिर्देशनाद्वारे उक्त अधिकारपद भरेल.

(३) नैमित्तिकरीत्या रिक्त झालेले अधिकारपद भरण्यासाठी पोट-कलम (१) अन्वये निवडण्यात आलेली किंवा पोट-कलम (२) अन्वये नामनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, कलम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या सदस्याच्या जागी तिला निवडून देण्यात आले असेल किंवा नामनिर्दिष्ट करण्यात आले असेल तो सदस्य, उक्त अधिकारपद रिक्त झाले नसते तर, ते जितक्या अवधीपर्यंत धारण केले असते तितक्याच अवधीपर्यंत पद धारण करेल.

**६.** (१) अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास, परिषदेस उद्देशून दिलेल्या लेखी नोटिशीद्वारे व उक्त नोटीस निबंधकाच्या स्वाधीन करून, कोणत्याही वेळी, आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल. असा राजीनामा परिषदेकडून ज्या दिनांकाला तो स्वीकारण्यात येईल त्या दिनांकापासून तो अंमलात येईल. राजीनामा.

(२) निवडून आलेल्या सदस्यास, कोणत्याही वेळी, अध्यक्षास उद्देशून लेखी नोटीस देऊन आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल. नामनिर्दिष्ट सदस्यास कोणत्याही वेळी राज्य शासनाला उद्देशून लेखी नोटीस देऊन आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल. असा प्रत्येक राजीनामा, यथास्थिति, अध्यक्ष किंवा राज्य शासन ज्या दिनांकाला तो स्वीकारील, त्या दिनांकापासून अंमलात येईल.

**७.** (१) एखादी व्यक्ती, सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा नामनिर्देशित होण्यास आणि सदस्य म्हणून चालू राहण्यास पुढील प्रसंगी निरर्ह ठरेल :— निरर्हता आणि असमर्थता.

(अ) जर ती विमुक्त दिवाळखोर असेल ;

(ब) जर ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने तिला तसे जाहीर केले असेल ;

(क) जर तिचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले असेल आणि पुन्हा तीमध्ये दाखल करण्यात आले नसेल ;

(ड) जर ती परिषदेची पूर्णकालिक अधिकारी किंवा कर्मचारी असेल.

(२) जर कोणताही सदस्य, कलम ४, पोट-कलम (७) अन्वये परिषदेने दिलेल्या परवानगीशिवाय किंवा परिषदेच्या मते जी पुरेशी असतील अशा कारणांशिवाय लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिला असेल तर, परिषदेला त्याची जागा रिक्त झाल्याचे जाहीर करता येईल आणि उक्त रिक्त जागा भरण्याकरिता उपाययोजना करता येईल.

(३) जर कोणताही सदस्य, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निरर्हतांपैकी कोणत्याही प्रकारे निरर्ह झाला किंवा अशा कोणत्याही निरर्हतेस पात्र ठरल्याचे आढळून आले तर, परिषद, राज्य शासनाला एक अहवाल सादर करील आणि त्यांच्या निरर्हतेविषयी राज्य शासनाची खात्री झाली तर, तो त्या सदस्याची जागा रिक्त झाल्याचे जाहीर करेल.

परिषदेच्या सभा.

८. (१) परिषदेच्या सभा विहित केलेल्या रीतीने बोलावण्यात, घेण्यात व भरविण्यात येतील आणि विहित केलेल्या रीतीने त्यांचे कामकाज चालविण्यात येईल.

(२) अध्यक्ष, तो जेव्हा हजर असेल त्यावेळी, परिषदेच्या प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारील. जर कोणत्याही सभेत अध्यक्ष गैरहजर असेल तर, उपाध्यक्षाने आणि दोघेही गैरहजर असतील तर, अशा सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांनी आपल्यामधून निवडून दिलेला एक सदस्य अशा सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारील.

(३) परिषदेच्या सभेत मांडल्या जाणा-या सर्व प्रश्नांचा निर्णय बहुमताने करण्यात येईल.

(४) समसमान मते पडतील अशा बाबतीत, सभेमध्ये अध्यक्षाचे काम चालविणा-या प्राधिका-यास, दुसरे किंवा निर्णायक मत असेल आणि तो असे मत देईल.

(५) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष धरुन आठ सदस्य मिळून सभेची गणपूर्ती होईल. जेव्हा गणपूर्तीची आवश्यकता असेल, परंतु गणपूर्ती होईल इतके सदस्य उपस्थित नसतील तेव्हा, अध्यक्षपदी असलेल्या प्राधिका-याकडून अशी सभा पुढील एखाद्या दिवसाच्या कोणत्याही वेळेपर्यंत तहकूब करण्यात येईल आणि अशी वेळ, तो परिषदेच्या कार्यालयातील सूचना फलकावर अधिसूचित करील ; आणि मूळ सभेत गणपूर्ती होण्यास आवश्यक इतके सदस्य हजर असते तर, त्या सभेत जे कामकाज आणले गेले असते ते कामकाज अशा रीतीने तहकूब करण्यात आलेल्या सभेत आणण्यात येईल आणि असे कामकाज, अशा सभेत किंवा अशा सभेनंतर तहकूब झालेल्या कोणत्याही पुढील सभेत निकालात काढता येईल— मग अशा सभेत गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असतील इतके सदस्य उपस्थित असोत वा नसोत.

सभांतील कामकाज व कृतींची विधिग्राह्यता.

**९.** (१) परिषदेच्या प्रत्येक सभेतील चर्चेचे कामकाज गोपनीय समजण्यात येईल ; आणि कोणत्याही व्यक्तीने, परिषदेने याबाबत आधी ठराव केलेला असल्याशिवाय अशा कामकाजाचा कोणताही भाग उघड करता कामा नये :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, परिषदेने स्वीकृत केलेल्या कोणत्याही ठरावातील मजकूर उघड करण्यास किंवा प्रसिद्ध करण्यास, कोणत्याही व्यक्तीस, प्रतिबंध होतो, असे समजता कामा नये; मात्र, परिषदेने असा ठरावसुद्धा गोपनीय राखण्यात यावा असा निदेश दिला नसला पाहिजे.

(२) कोणतीही व्यक्ती, सदस्य म्हणून किंवा अध्यक्ष म्हणून किंवा उपाध्यक्ष म्हणून किंवा सभेचे कामकाज चालविणारा प्राधिकारी म्हणून निरर्ह होती किंवा तिच्या निवडणुकीत किंवा नामनिर्देशनामध्ये दोष होता एवढ्याच केवळ गोष्टीमुळे परिषदेच्या एखाद्या कृतीमध्ये किंवा कामकाजामध्ये सहभागी असणा-या बहुसंख्य व्यक्तींना मतदानाचा हक्क असेल तेव्हा, त्या कृतीमध्ये किंवा कामकाजामध्ये अशा व्यक्तीने भाग घेतला असेल तर, ती कृती किंवा ते कामकाज निष्फळ ठरते असे समजता कामा नये.

(३) परिषदेमध्ये कोणतीही जागा रिक्त असताना, चालू असलेल्या सदस्यांना जणू अशी जागा रिक्त झाली नाही असे समजून परिषदेचे काम चालविता येईल :

परंतु, अशा रिक्त जागांची संख्या कोणत्याही वेळी सातपेक्षा अधिक असता कामा नये.

परिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कामे.

**१०.** या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये किंवा तद्नुसार विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, परिषदेचे अधिकार, कर्तव्ये आणि कामे ही पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) नोंदवही ठेवणे आणि वैद्यक व्यवसायींच्या नोंदणीसाठी तरतूद करणे ;

(ब) प्रबंधकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध केलेल्या अपिलांची सुनावणी करणे व त्यावर निर्णय देणे ;

(क) वैद्यक व्यवसायींच्या, व्यवसायविषयक वर्तणुकीचे विनियमन करण्यासाठी नितीशास्त्राची संहिता विहित करणे ;

(ड) व्यवसायीची खरडपट्टी काढणे किंवा नोंदवहीत त्याचे नाव निलंबित ठेवणे किंवा नोंदवहीतून काढून टाकणे किंवा परिषदेच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशी इतर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करणे ;

(इ) या अधिनियमात घालून देण्यात येतील किंवा विहित करण्यात येतील अशा, इतर कोणत्याही अधिकारांचा वापर करणे, अशी इतर कोणतीही कर्तव्ये पार पाडणे आणि अशी इतर कोणतीही कामे करणे.

**११.** (१) परिषद, शक्य होईल तितक्या लवकर, अध्यक्ष-पदसिद्ध, [१][ उपाध्यक्ष-पदसिद्ध ] [२][ संचालक, आरोग्य सेवा-पदसिद्ध व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन-पदसिद्ध ] व विहित करण्यात येतील इतके परिषदेने [३][ एकाच संक्रमणीय मताद्वारे, प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पद्धतीनुसार ] आपल्या सदस्यांमधून निवडलेले इतर सदस्य यांचा समावेश असलेली एक कार्यकारी समिती घटित करील. कार्यकारी समिती.

(२) कार्यकारी समितीच्या सदस्यांचा पदावधी, तीत आकस्मिकरीत्या रिक्त झालेल्या जागा भरण्याची रीत व तिने अनुसरावयाची कार्यपद्धती ही विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) या अधिनियमान्वये देण्यात आलेले अधिकार, लादण्यात आलेली कर्तव्ये व सोपविण्यात आलेली कामे यांच्या जोडीने, कार्यकारी समितीने नियमांद्वारे तिच्याकडे सोपविण्यात येतील किंवा परिषदेकडून वेळोवेळी तिला देण्यात येतील असे परिषदेचे अधिकार वापरले पाहिजेत व अशी कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

**१२.** परिषदेच्या अध्यक्षास, उपाध्यक्षास व इतर सदस्यांना आणि तिच्या कार्यकारी समितीच्या सदस्यांना, सभेस हजर राहण्यासाठी वेळोवेळी विहित करण्यात येईल अशी फी व भत्ते आणि वाजवी प्रवासभत्ता देण्यात येईल. परिषदेच्या आणि कार्यकारी समितीच्या सदस्यास द्यावयाची फी व भत्ते.

**१३.** (१) परिषदेच्या उत्पन्नात पुढील बाबी समाविष्ट असतील :— परिषदेचे उत्पन्न व खर्च.

(अ) वैद्यक व्यवसायींकडून मिळालेली फी,

(ब) राज्य शासनाकडून कोणतीही अनुदाने मिळाली असल्यास ती, आणि

(क) परिषदेस मिळालेल्या इतर कोणत्याही रकमा.

(२) परिषद, पुढील प्रयोजनांसाठी खर्च करण्यास सक्षम असेल :—

(अ) परिषदेच्या प्रबंधकाचे व कर्मचारीवर्गाचे वेतन व भत्ते ;

(ब) परिषदेच्या आणि कार्यकारी समितीच्या सदस्यांना द्यावयाची फी व भत्ते ;

(क) न्यायसहायकास द्यावयाचे पारिश्रमिक ; आणि

(ड) या अधिनियमाखालील कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील असे इतर खर्च.

**१४.** (१) परिषद, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने प्रबंधकाची नेमणूक करेल. परिषदेच्या प्रबंधकाची नेमणूक, त्याची कर्तव्ये व कामे.

(२) कार्यकारी समितीस वेळोवेळी प्रबंधकास रजा मंजूर करता येईल :

परंतु, रजेचा कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक नसेल तर, अध्यक्षास रजा मंजूर करता येईल.

(३) रजेवर गेल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रबंधकाचे अधिकारपद कोणत्याही प्रकारे तात्पुरते रिक्त झाले असता, कार्यकारी समितीस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, त्याच्या जागी काम करण्यासाठी म्हणून दुस-या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि याप्रमाणे नेमण्यात आलेली कोणतीही व्यक्ती ही, अशा नेमणुकीच्या कालावधीत, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता निबंधक असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, अशा रीतीने जागा रिक्त असण्याचा कालावधी एक महिन्यापेक्षा अधिक नसेल तेव्हा, अशी नेमणूक अध्यक्षास करता येईल व तो अशी नेमणूक केल्याचे कार्यकारी समितीस आणि राज्य शासनास ताबडतोब कळवील ;

(४) परिषदेस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने प्रबंधक म्हणून नेमण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस पदावरून निलंबित करता येईल, बडतर्फ करता येईल किंवा काढून टाकता येईल किंवा त्याच्यावर इतर कोणतीही शास्ती लादता येईल.

(५) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीजकरून, प्रबंधकाचे वेतन व भत्ते आणि त्याच्या सेवेच्या इतर शर्ती या विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(६) प्रबंधक हा, परिषदेचा सचिव आणि कार्यकारी अधिकारी असेल. तो परिषदेच्या आणि तिच्या कार्यकारी समित्यांच्या सर्व सभांना उपस्थित राहील आणि तो अशा सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे व अशा सभांतील कामकाज यांचे कार्यवृत्त ठेवील.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ३ (अ) अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ३ (अनुसूची) अन्वये " आणि महाराष्ट्र शासनाचे महाशल्यचिकित्सक" या मजकुराऐवजी सदर मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम ३ (ब) अन्वये " विहित करण्यात येतील इतके परिषदेने " या मजकुरानंतर सदर मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(७) प्रबंधक, विहित केलेल्या रीतीने परिषदेचे लेखे ठेवील.

(८) प्रबंधकास, कर्मचारीवर्गावर विहित करण्यात येतील असे पर्यवेक्षकीय अधिकार वापरता येतील आणि त्यास या अधिनियमात निर्दिष्ट करण्यात येतील किंवा विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये व कामे पार पाडता येतील.

(९) या कलमान्वये नेमण्यात आलेला प्रबंधक हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. १८६० चा ४५.

परिषदेचे इतर कर्मचारी.

**१५.** (१) परिषदेस, या अधिनियमाखालील तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा प्रबंधकाव्यतिरिक्त इतर अधिका-यांची आणि कर्मचा-यांची नेमणूक करता येईल :

परंतु, अशा अधिका-यांची आणि कर्मचा-यांची संख्या व पदनामे आणि त्यांचे वेतन व भत्ते हे, परिषद राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, निश्चित करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, याबाबतीत परिषद घालून देईल त्या वित्तीय मर्यादेस अधीन राहून, कार्यकारी समिती ही, तात्पुरते वाढलेले काम किंवा हंगामी स्वरूपाचे कोणतेही काम पार पाडण्यासाठी लिपिकांची किंवा कर्मचा-यांची तात्पुरती पदे निर्माण करण्यास आणि त्यावर नेमणुका करण्यास सक्षम असेल.

(३) परिषदेच्या अधिका-यांच्या आणि कर्मचा-यांच्या सेवेच्या इतर शर्ती या विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(४) या कलमान्वये नेमण्यात आलेले परिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. १८६० चा ४५.

---

प्रकरण तीन

## नोंदवही तयार करणे व ठेवणे

नोंदवही तयार करणे.

**१६.** (१) नेमलेल्या दिवसानंतर, शक्य तितक्या लवकर, प्रबंधक या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, राज्याकरिता म्हणून वैद्यक व्यवसायींची एक नोंदवही तयार करेल आणि ती ठेवील.

(२) नोंदवही ही, विहित करण्यात येईल अशा नमुन्यानुसार असेल आणि विहित करण्यात येईल इतक्या भागांमध्ये तिची विभागणी करता येईल. नोंदवहीमध्ये नोंदणी केलेल्या व्यवसायीचे संपूर्ण नाव, राहण्याचा पत्ता आणि ज्या दिनांकास त्याने प्रत्येक अर्हता प्राप्त केली असेल तो दिनांक आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील यांचा समावेश असेल.

(३) या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याच्या पहिल्या, दुस-या किंवा तिस-या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हतांपैकी कोणतीही अर्हता धारण करणा-या कोणत्याही व्यक्तीस भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ द्वारे किंवा तद्न्वये घालून दिलेल्या शर्तीस अधीन राहून, विहित केलेल्या नमुन्यामध्ये प्रबंधकाकडे अर्ज केल्यावर आणि [१][ राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी फी ] दिल्यावर आणि त्याची पदवी, पदविका, लायसन्स किंवा प्रमाणपत्र सादर केल्यावर, कोणत्याही वेळी नोंदवहीमध्ये आपल्या नावाची नोंद करून घेण्याचा हक्क असेल : १९५६ चा १०२.

परंतु, जो अर्जदार आपली पदवी, पदविका, लायसन्स किंवा प्रमाणपत्र सादर करू शकत नसेल असा अर्जदार, अशी पदवी, पदविका, लायसन्स किंवा प्रमाणपत्र धारण करीत आहे परंतु, पुरेशा कारणास्तव तो ते आपल्या अर्जासोबत सादर करू शकत नाही अशी त्याने अध्यक्षाची खात्री करून दिल्यास, त्याचे नाव नोंदवहीत दाखल करता येईल.

(४) ज्या व्यक्तीच्या नावाची—

(अ) राज्याच्या मुंबई क्षेत्रात अंमलात असल्याप्रमाणे असलेला मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ याचे कलम ६ अन्वये रीतसर ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी ज्या व्यक्तीच्या नावाची नोंद करण्यात आली असेल अशा प्रत्येक व्यक्तीचे नाव ; किंवा १९१२ चा मुंबई अधिनियम ६.

(ब) राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असल्याप्रमाणे, मध्यप्रांत व व-हाड वैद्यकीय नोंदणी अधिनियम, १९१६ याच्या कलम ११ अन्वये रीतसर ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत १ नोव्हेंबर, १९५६ रोजी किंवा त्यानंतर आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी ज्या व्यक्तीच्या नावाची नोंद करण्यात आली असेल ; १९१६ चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम १.

अशा प्रत्येक व्यक्तीचे नाव या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या नोंदवहीत नोंदविण्यात येईल, मात्र, या प्रयोजनाकरिता अशा व्यक्तीस अर्ज करण्याची किंवा कोणतीही फी देण्याची आवश्यकता असणार नाही.

---

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९१६ चा मध्यप्रांत व व-हाड अधिनियम १. १३४८ फसली चा हैदराबाद १.

(५) (अ) राज्याच्या विदर्भ विभागात अंमलात असल्याप्रमाणे, मध्यप्रांत व व-हाड वैद्यकीय नोंदणी अधिनियम, १९१६ याच्या कलम ११ अन्वये किंवा राज्याच्या हैदराबाद क्षेत्रात अंमलात असल्याप्रमाणे वैद्यक व्यवसायी नोंदणी अधिनियम यांच्या कलम १० अन्वये रीतसर ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवशी (निकटपूर्वीच्या पोट-कलमातील परिच्छेद (ब) च्या कक्षेत अगोदरच आलेल्या कोणत्याही व्यक्तीविरूद्ध) ज्या व्यक्तीच्या नावाची नोंद करण्यात आली असेल अशा प्रत्येक व्यक्तीचे नाव, खंड (अ) च्या तरतुदींना अधीन राहून, या अधिनियमान्वये तयार करण्यात आलेल्या नोंदवहीत दाखल करण्यात आले पाहिजे. या प्रयोजनाकरिता अशा व्यक्तीस अर्ज करण्याची किंवा कोणतीही फी देण्याची आवश्यकता असणार नाही.

(ब) खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नेमलेल्या दिवसापासून तीन महिन्यांच्या मुदतीत किंवा राज्य शासन मुभा देईल अशा आणखी कालावधीत, प्रबंधक, **राजपत्रात** आणि परिषद निवड करील अशा वृतपत्रांमध्ये, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात सर्वसाधारण नोटीस प्रसिद्ध करील आणि अशा प्रत्येक व्यक्तीस तिच्या माहीत असलेल्या शेवटच्या पत्त्यावर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, वैयक्तिक नोटीस नोंदणीकृत डाकेने पाठवील आणि उक्त नोटिशीद्वारे या अधिनियमाखालील नोंदवहीमध्ये आपले नाव चालू ठेवण्याची तिची इच्छा असेल तर, तिने विहित केलेल्या रीतीने दोन रुपये फी प्रबंधकाकडे भरण्याबद्दल तिला फर्मावण्यात येईल. **राजपत्रात** सर्वसाधारण नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी अशा फीचा भरणा करील अशा प्रत्येक व्यक्तीचे नाव नोंदवहीत चालू ठेवण्यात येईल. मात्र या प्रयोजनांकरिता अशा व्यक्तीस अर्ज करण्याची किंवा कोणतीही फी देण्याची आवश्यकता असणार नाही. जर अशी फी वेळेवर देण्यात आली नाही तर, प्रबंधक कसूर करणा-या व्यक्तीचे नाव नोंदवहीतून काढून टाकील :

परंतु, ज्या दिनांकापर्यंत फीचा भरणा करणे आवश्यक असेल त्या शेवटच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत, अशा रीतीने काढून टाकलेले नाव चालू रहाण्यासाठी, कोणताही अर्ज प्रबंधकाकडे करण्यात आल्यास, अशा रीतीने काढून टाकण्यात आलेले नाव, पाच रुपये फी दिल्यानंतर, नोंदवहीत पुन्हा दाखल करता येईल.

(६) निकटपूर्वीच्या पोट-कलमाच्या खंड (ब) अन्वये दोन रुपये फी द्यावयाचा शेवटचा दिनांक उलटून गेल्यानंतर आणि पूर्वगामी तरतुदीस अनुसरून, नोंदवही तयार करण्यात आल्यानंतर प्रबंधक, **राजपत्रात** आणि परिषदेकडून निवड करण्यात येईल अशा वृत्तपत्रात नोंदवही तयार झाल्याबद्दलची नोटीस प्रसिद्ध करण्यात येईल आणि अशी नोंदवही ही, **राजपत्रात** अशी नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

(७) प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायीस, विहित केलेल्या नमुन्यात, नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. नोंदणीकृत व्यवसायी, नोंदणी प्रमाणपत्र आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी ठळक जागी आणि जर अशी ठिकाणे एकाहून अधिक असतील तर त्यापैकी कोणत्याही एका ठिकाणी प्रदर्शित करील.

विवक्षित बाबतीत नोंदणी करण्यासाठी विशेष कार्यपद्धती.

**१७.** (१) पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरल्याशिवाय भारताच्या प्रदेशाबाहेरील कोणत्याही ठिकाणातील कोणत्याही प्राधिका-याने दिलेली वैद्यकीय अर्हता (भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याच्या दुस-या अनुसूचीत किंवा तिस-या अनुसूचीच्या भाग २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हताव्यतिरिक्त) धारण करणा-या कोणत्याही व्यक्तीचे नाव, या अधिनियमान्वये नोंदविण्यात येता कामा नये. (१९५६ चा १०२.)

(२) अशी कोणतीही वैद्यकीय अर्हता धारण करणा-या कोणत्याही व्यक्तीस ज्या दिनांकास त्या अर्हता प्रदान करण्यात आल्या त्या दिनांकासहित तिच्या अर्हतेसंबंधीचा बिनचूक तपशील देऊन, आणि तिची पदवी, पदविका, लायसन्स किंवा प्रमाणपत्र सादर करून नोंदणीसाठी परिषदेकडे अर्ज करता येईल. अर्जदाराने धारण केलेली पदवी, पदविका, लायसन्स किंवा प्रमाणपत्र यावरून, त्या अर्जदाराला वैद्यक व्यवसायी म्हणून आपला व्यवसाय कार्यक्षम रीतीने करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान व कौशल्य असल्याची परिषदेची खात्री होत असेल तर, परिषद, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये घटित करण्यात आलेल्या भारताच्या वैद्यक परिषदेच्या कार्यकारी समितीच्या पूर्वमंजुरीने आणि [१][ राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी फी ] भरण्यात आल्यानंतर, अर्जदार हा, जर भारताचा नागरिक असेल तर त्याचे नाव नोंदवहीत दाखल करता येईल, आणि अर्जदार असा नागरिक नसेल तर, परिषदेस ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल त्या शर्तीला अधीन राहून, नोंदवहीत त्याचे नाव दाखल करता येईल. (१९५६ चा १०२.)

ज्यांची नोंदणी करता येणार नाही अशा व्यक्ती.

**१८.** कलम १६ आणि १७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये किंवा वैद्यक व्यवसायींच्या नोंदणीचे विनियमन करण्यासंबंधी भारतात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये ठेवण्यात आलेल्या कोणत्याही नोंदवहीतून जिचे नाव व्यवसायविषयक गैरवर्तणुकीबद्दल काढून टाकण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, ज्या नोंदवहीतून तिचे नाव अशा रीतीने काढून टाकण्यात आले असेल त्या नोंदवहीत ते पुन्हा दाखल करण्याबद्दल रीतसर आदेश देण्यात आल्याशिवाय नोंदवहीत आपले नाव दाखल करवून घेण्याचा हक्क असणार नाही.

---

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

तात्पुरत्या नोंदणी करिता फी आणि तात्पुरत्या नोंदणीसंबंधीचे प्रमाणपत्र.

**१९.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीस, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याचे कलम २५ अन्वये तात्पुरती नोंदणी करून घेण्याची इच्छा असेल अशी व्यक्ती, विहित केलेल्या नमुन्यात प्रबंधकाकडे अर्ज करेल आणि त्यासोबत [१] [ राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी फी ] देईल. १९५६ चा १०२.

(२) ज्या व्यक्तीचे नाव पोट-कलम (१) अन्वये नोंदवहीत दाखल करण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, विहित केलेल्या नमुन्यात तात्पुरत्या नोंदणीचे प्रमाणपत्र देण्यात येईल. असे प्रमाणपत्र, त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीकरिता अंमलात राहील.

नोंदवही ठेवणे.

**२०.** (१) नोंदवहीत, वेळोवेळी नोंदी करणे, त्यात सुधारणा करणे आणि या अधिनियमाच्या व तद्न्वये केलेल्या नियमांच्या तरतुदीअनुसार नोंदणी प्रमाणपत्रे देणे हे प्रबंधकाचे कर्तव्य असेल.

(२) नोंदणीकृत व्यवसायींपैकी जे मरण पावतील किंवा कलम २२ अन्वये ज्यांची नावे नोंदवहीतून काढून टाकण्याविषयी निदेश देण्यात येईल त्यांची नावे नोंदवहीतून काढून टाकण्यात येतील.

(३) ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव नोंदवहीत दाखल करण्यात आले असेल आणि अशा रीतीने तिची नोंदणी झाल्यानंतर आपल्या नावातील कोणताही बदल नोंदवहीत दाखल करण्याची जिची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, याबाबतीत अर्ज केल्यावर आणि विहित केलेली फी दिल्यानंतर आपल्या नावातील बदल नोंदवहीत दाखल करवून घेण्याचा हक्क असेल.

(४) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ चे कलम २६ च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव नोंदवहीत दाखल करण्यात आले असेल आणि नोंदणी झाल्यानंतर जिने या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीत किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याच्या अनुसूचीपैकी कोणत्याही अनुसूचीत निर्दिष्ट करण्यात आलेली अर्हता आणखी प्राप्त केली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, याबाबतीत अर्ज केल्यानंतर आणि विहित केलेली फी दिल्यानंतर नोंदवहीत आपल्या नावासमोर आणखी प्राप्त केलेल्या अशा अर्हतेची नोंद करवून घेण्याचा हक्क असेल. १९५६ चा १०२. १९५६ चा १०२.

[२][(५) त्यासंबंधी प्रबंधकाला, प्रमाणपत्राच्या दुस-या प्रतीसाठी अर्ज आल्यानंतर आणि विहित फी भरल्यावर, प्रमाणपत्राची दुसरी प्रत देता येईल.]

नोंदणीकृत व्यवसायीची सूची प्रसिद्ध करणे.

**२१.** (१) कलम १६, पोट-कलम (६) अन्वये नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर परिषदेस योग्य वाटेल अशा वेळी आणि त्यानंतर प्रत्येक पाच वर्षानंतर, प्रबंधक, नोंदवहीत त्या त्या वेळी दाखल करण्यात आलेल्या सर्व व्यक्तींची एक बिनचूक सूची छापण्याची व ती प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील.

(२) प्रबंधक, पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध केलेल्या सूचीचे दरवर्षी कार्यकारी समितीकडून ठरविण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी पुरवणी पत्र व शुद्धिपत्र छापून घेण्याची व ते प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करेल आणि त्यात पुढील गोष्टी दर्शविण्यात आल्या पाहिजेत,—

(अ) नोंदवहीत त्या त्या वेळी दाखल केलेल्या किंवा पुन्हा दाखल केलेल्या आणि अगोदरच छापून प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही विद्यमान सूचीत समाविष्ट न करण्यात आलेल्या सर्व व्यक्तींची नावे ;

(ब) ज्यांची नावे अशा मुदतीत कोणत्याही कारणावरून नोंदवहीतून काढून टाकण्यात आली असतील आणि ती त्यात पुन्हा दाखल केली नसतील अशा आणि विद्यमान सूचीत समाविष्ट केलेल्या सर्व व्यवसायींची नावे ; आणि

(क) विद्यमान सूचीत केलेल्या इतर कोणत्याही दुरूस्त्या.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध केलेल्या सूचीचा नमुना, तीत समाविष्ट करावयाचा तपशील आणि ती प्रसिद्ध करण्याची रीती ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(४) सर्व न्यायालयात आणि सर्व न्यायिक व अर्धन्यायिक कामकाजात, पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या सूचीची प्रत ही, तीत निर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार नोंदणी करण्यात आलेल्या व्यक्ती आहेत याबद्दलचा पुरावा असेल आणि अशा प्रतीत कोणत्याही व्यक्तीचे नाव नसणे हे, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईतोपर्यंत अशा व्यक्तीची या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार नोंदणी करण्यात आलेली नाही याबाबतचा पुरावा असेल :

परंतु, अशा प्रतीत ज्याचे नाव नसेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, अशा व्यक्तीचे नाव नोंदवहीत दाखल करण्यात आल्याबद्दलची प्रबंधकाची सही असलेली प्रमाणित प्रत ही, अशा व्यक्तीची या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नोंदणी करण्यात आली असल्याचा पुरावा असेल.

नोंदवहीतून नाव काढून टाकणे.

**२२.** (१) परिषदेने (किंवा कार्यकारी समितीने) विहित केलेल्या रीतीने, केलेल्या योग्य चौकशीअंती परिषदेस, कोणताही नोंदणी केलेला व्यवसायी, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आढळून आले तर, परिषदेस—

(अ) अशा व्यवसायीस ताकीद देणारे पत्र पाठविता येईल ; किंवा

---

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४ द्वारे पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.

(ब) अशा व्यवसायीचे नाव,—

(एक) निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी नोंदवहीतून काढून टाकण्याविषयी ; किंवा

(दोन) नोंदवहीतून कायमचे काढून टाकण्याचा निदेश देता येईल.

**स्पष्टीकरण :**—या कलमाच्या प्रयोजनासाठी गैरवर्तणूक, याचा अर्थ खाली दिल्याप्रमाणे समजावा—

१८९८ चा ५. (एक) ज्यात नैतिक अधःपाताचा अंतर्भाव होतो व जी [१][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ] च्या अर्थांतर्गत दखलपात्र असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल एखाद्या फौजदारी न्यायालयाकडून करण्यात येणा-या न्यायचौकशीत एखाद्या नोंदणीकृत व्यवसायीचा दोष सिद्ध झाला असेल तर ; किंवा

१८९८ चा ५. १९५० चा ४६. (दोन) [१][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ] च्या अर्थांतर्गत दखलपात्र असलेल्या अपराधाबद्दल लष्करी कायद्याच्या अंमलाखाली येणा-या नोंदणीकृत व्यवसायीचा, सेना अधिनियम, १९५० खाली दोष सिद्ध झाला असेल ; किंवा

१९५६ चा १०२. (तीन) जी कोणतीही वर्तणूक, परिषदेच्या मते, वैद्यकीय पेशाच्या संदर्भात विशेषतः या संबंधात परिषदेने किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये घटित केलेल्या भारताच्या वैद्यक परिषदेने याबाबतीत विहित केलेल्या कोणत्याही नीतीशास्त्रसंहितेखाली अतिनिंद्य असेल.

(२) जर अशा कोणत्याही व्यवसायीचे नाव,—

१९६१ चा महा. २८. (अ) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत किंवा सूचीत दाखल करण्यात आले असेल ; किंवा

१९६० चा मुंबई १२. (ब) *मुंबई समचिकित्सा व जीवरसायन वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९५९ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत किंवा सूचीत दाखल करण्यात आले असेल ;

तर निबंधकाने उक्त नोंदवही किंवा उक्त सूची ठेवण्याचा हक्क असलेल्या प्राधिका-यास अशा रीतीने नाव काढून टाकण्यात आल्याबद्दल कळविणे, हे त्याचे कर्तव्य असेल.

(३) जर एखाद्या नोंदणीकृत व्यवसायीचे नाव, पोट-कलम (२) मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याअन्वये ठेवण्यात आलेल्या यथास्थिति, नोंदवहीत किंवा सूचीतही दाखल करण्यात आले असेल आणि उक्त नोदवहीतून किंवा उक्त सूचीतून ते काढून टाकण्यात आले असेल आणि अशा रितीने, ते नाव काढून टाकण्यात आले आहे ही गोष्ट परिषदेच्या निदर्शनास आली असेल किंवा आणली असेल तर, परिषद उक्त नाव, या अधिनियमान्वये ठेवलेल्या नोंदवहीतून सुद्धा काढून टाकेल.

(४) पुरेसे कारण दर्शविण्यात आल्यानंतर, त्यानंतरच्या कोणत्याही पुढील दिनांकास, परिषदेस, पोट-कलम (१) किंवा (३) अन्वये ज्या वैद्यक व्यवसायीचे नाव काढून टाकण्यात आले असेल त्या वैद्यक व्यवसायीचे नाव, विहित करण्यात येतील अशा शर्तीवर आणि विहित करण्यात येईल अशी फी दिल्यावर नोंदवहीत पुन्हा दाखल करण्याचा निदेश देता येईल.

(५) परिषदेने स्वतः होऊन किंवा कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून, रीतसर व यथोचित चौकशी केल्यानंतर आणि तसेच संबंधित व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, परिषदेचे असे मत झाले की, नोंदवहीतील एखादी नोंद कपटपूर्वक किंवा चुकीने करण्यात आली आहे तर, परिषदेस अशी नोंद रद्द करता किंवा तीत फेरफार करता येईल.

१९०८ चा ५. (६) पुढील बाबींच्या संबंधात दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतील तेच अधिकार या कलमान्वये कोणतीही चौकशी करताना यथास्थिति, अशा परिषदेस किंवा कार्यकारी समितीस असतील :—

(अ) कोणत्याही व्यक्तीस हजर राहाण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ब) दस्तऐवज सादर करण्याची सक्ती करणे ;

(क) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

१८६० चा ४५. (७) या कलमाखालील चौकशीची सर्व कामे ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ याच्या अर्थानुसार न्यायालयीन कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

---

[१] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ५ अन्वये मूळ मजकुराऐवजी सदर मजकूर दाखल करण्यात आला.

*सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या नोंद क्रमांक ८३ द्वारे या अधिनियमाच्या संक्षिप्त नावात " महाराष्ट्र समचिकित्सा व जीवरसायन वैद्यक व्यवसायी अधिनियम " अशी सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे, १९६० पासून करण्यात आली असल्याचे मानन्यात यावे.

(८) (अ) या कलमाखालील कोणत्याही चौकशीत उद्‌भवणा-या, कायद्यांसंबंधीच्या कोणत्याही प्रश्नावर यथास्थिति, परिषदेस किंवा कार्यकारी समितीस सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी अशा सर्व चौकशीत एखादा न्यायसहाय्यक असेल आणि तो, कमीत कमी दहा वर्ष :—

(एक) अधिवक्ता अधिनियम, १९६१ खालील नोंदणीकृत अधिवक्ता असेल ; किंवा १८६१ चा २५.

(दोन) उच्च न्यायालयाचा न्यायवादी असेल.

**स्पष्टीकरण :**—या खंडाच्या प्रयोजनासाठी, एखाद्या व्यक्तीची अधिवक्ता म्हणून ज्या कालावधीत नोंदणी करण्यात आली असेल तो कालावधी मोजताना ज्या कालावधीत त्याची भारतीय वकील परिषद अधिनियम, १९२६ अन्वये अधिवक्ता म्हणून नोंदणी करण्यात आली असेल असा कोणताही कालावधी समाविष्ट करण्यात येईल. १९२६ चा ३८.

(ब) जर न्यायसहाय्यकाने, पुरावा, कार्यपद्धती, किंवा अन्य बाब यांच्या संबंधातील कायद्यासंबंधीच्या कोणत्याही प्रश्नावर परिषदेस, किंवा कार्यकारी समितीस सल्ला दिला तर, त्याने असा सल्ला, चौकशीत भाग घेणारा पक्षकार, किंवा तीत भाग घेणा-या पक्षकाराचे प्रतिनिधित्व करणारी जी व्यक्ती अशा चौकशीच्या वेळी उपस्थित असेल अशा प्रत्येक पक्षकारासमक्ष किंवा व्यक्तीसमक्ष देईल ; किंवा असा सल्ला परिषदेने किंवा कार्यकारी समितीने आपल्या निष्कर्षाबाबत चर्चा करण्यास सुरूवात केल्यानंतर देण्यात आला असेल तर, उपरोक्त अशा प्रत्येक पक्षकारास किंवा व्यक्तीस, न्यायसहाय्यकाने जो सल्ला दिला असेल त्याबाबत कळविण्यात येईल. जर कोणत्याही बाबतीत, परिषदेने किंवा कार्यकारी समितीने उपरोक्त अशा कोणत्याही प्रश्नावर न्यायसहाय्यकाने दिलेला सल्ला स्वीकारलेला नसेल तर, त्याबाबतसुद्धा अशा पक्षकारास किंवा व्यक्तीस कळवील.

(क) या कलमान्वये नियुक्त करावयाच्या न्यायसहाय्यकाची सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही विशिष्ट चौकशीच्या किंवा चौकशीच्या वर्गाच्या संबंधात नेमणूक करता येईल आणि त्यास विहित करण्यात येईल असे पारिश्रमिक देण्यात येईल.

नोंदणीचे नवीकरण. [1][ **२३.** कलमे १६, १७ व २१ यात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) परिषद, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापूर्वी नोंदणी प्रमाणपत्र धारण करणारा प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायी, अशा विनिर्दिष्ट दिनांकापासून चार महिन्यांच्या कालावधीत, नोंदणीच्या नवीकरणासाठी प्रबंधकाकडे पाचशे रुपयांच्या नवीकरण फीसह विहित नमुन्यात अर्ज करील ;

(ब) विनिर्दिष्ट कालावधीत जो आपल्या नोंदणीचे नवीकरण करण्यासाठी अर्ज करू शकणार नाही अशा नोंदणीकृत व्यवसायीस, नोंदणीच्या नवीकरणासाठी, दर महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, शंभर रुपये इतक्या विलंब फीसह, विहित नमुन्यात अर्ज करता येईल ;

(क) खंड (अ) अथवा खंड (ब) अन्वये नूतनीकरण केलेले नोंदणी प्रमाणपत्र मिळविले आहे अशा प्रत्येक नोंदणीकृत व्यवसायीने, त्यानंतर, दर पाच वर्षांनी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी नवीकरण फी किंवा विलंब फी प्रदान करून त्याचे नवीकरण करणे आवश्यक असेल :

परंतु, अशी व्यक्ती, खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये केलेल्या नोंदणीच्या नवीकरणापासून पाच वर्षांचा नोंदणी कालावधी संपण्याच्या दिनांकापूर्वीच्या दोन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही अशा मुदतीत, तिच्या नोंदणी प्रमाणपत्राच्या नवीकरणासाठी, या खंडान्वये विनिर्दिष्ट केली असेल अशा आवश्यक फीसह विहित नमुन्यात अर्ज करील ;

(ड) प्रबंधक, नोंदणी केल्यानंतर किंवा नोंदणी प्रमाणपत्राचे नवीकरण केल्यानंतर अशा व्यवसायीस, विहित केले असेल अशा नमुन्यात व विहित अशा तपशीलाचा समावेश असलेले ओळखपत्र देखील देईल. ]

अपीले. **२४.** (१) या अधिनियमान्वये प्रबंधकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिला ज्या दिनांकास असा निर्णय कळविण्यात आला असेल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, परिषदेकडे अपील करता येईल आणि परिषद विहित केलेल्या रीतीने त्या अपिलाची सुनावणी करील व त्याचा निर्णय करील.

(२) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ यात तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त या अधिनियमान्वये परिषदेने दिलेला प्रत्येक निर्णय हा अंतिम असेल. १९५६ चा १०२.

नोंदणीकृत व्यवसायीचे हक्क. **२५.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) "कायदेशीररीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" किंवा "रीतसर अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" या शब्दप्रयोगात तसेच वैद्यक व्यवसायी म्हणून किंवा वैद्यक व्यवसायातील व्यक्ती म्हणून कायद्याअन्वये मान्यता दिलेली व्यक्ती आहे अशा अर्थाच्या कोणत्याही शब्दामध्ये राज्य विधानमंडळाच्या सर्व अधिनियमात आणि सर्व केंद्रीय अधिनियमात, (ते राज्यास लागू करताना) अशा अधिनियमांचा भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची २ किंवा सूची ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबीशी जेथवर संबंध येत असेल तेथवर, या अधिनियमान्वये नोंदवहीत ज्याचे नाव दाखल करण्यात आले असेल अशा वैद्यक व्यवसायींचा समावेश होईल.

(दोन) प्रत्येक नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीस त्याची तशी इच्छा असल्यास, [2][ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अन्वये ] कोणत्याही मरणोत्तर चौकशीत काम करण्यापासून सूट मिळेल. १९७४ चा २.

---

[1] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ५ अन्वये कलम २३ दाखल करण्यात आले.

[2] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ७ अन्वये मूळ मजकुराऐवजी सदर मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१९५६ चा १०२. १९६१ चा महा. १८. **२६.** या अधिनियमाच्या तरतुदी या, सर्व वैद्यक व्यवसायींना लागू असणा-या सर्वसाधारण तरतुदींचा समावेश असलेल्या भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ आणि महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ याचे प्रकरण ६ याच्या तरतुदींच्या जोडीने असतील व त्यामुळे त्या तरतुदींचे अल्पीकरण होणार नाही. वैद्यक व्यवसायींना लागू असलेल्या सर्वसाधारण तरतुदी.

प्रकरण चार

## संकीर्ण

**२७.** परिषदेस,— परिषदेस माहिती मागविण्याचा व परिक्षेस उपस्थित राहण्यास फर्माविण्याचा अधिकार असणे.

(अ) कोणतीही वैद्यकीय किंवा शल्यचिकित्सा विषयक अर्हता प्रदान करण्याच्या संबंधात अशा मंडळाकडून किंवा प्राधिका-याकडून विहित केलेल्या कोणत्याही पाठ्यक्रमाविषयीचा किंवा अशा विद्यालयात किंवा महाविद्यालयात घेण्यात येणा-या परीक्षेसंबंधीचा परिषदेस आवश्यक वाटेल असा तपशील पुरविण्यासाठी ; आणि

(ब) परिषदेच्या मते, या प्रयोजनासाठी जी व्यक्ती किंवा ज्या व्यक्तीं विशेष अर्हताप्राप्त असतील अशा व्यक्तीस किंवा व्यक्तींना अशा कोणत्याही परीक्षेस हजर राहण्यास परवानगी देण्यासाठी कोणत्याही वैद्यक महाविद्यालयाच्या किंवा विद्यालयाच्या नियामक मंडळास किंवा प्राधिका-यास आणि अनुसूचीमध्ये ज्या कोणत्याही परीक्षक मंडळाचा समावेश करण्यात आला असेल किंवा ज्यांची समाविष्ट होण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही परीक्षक मंडळास फर्माविण्याचा अधिकार असेल.

**२८.** (१) एखादी पदवी, पदविका, लायसन्स किंवा प्रमाणपत्र किंवा तशाच स्वरूपाचा इतर कोणताही पुरस्कार प्रदान करणा-या कोणत्याही विद्यापीठाने, महाविद्यालयाने, संस्थेने किंवा परिसंस्थेने विहित केलेला पाठ्यक्रम व परीक्षा या अधिनियमाच्या किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ च्या कोणत्याही अनुसूचीत अंतर्भूत केलेली नाही ; पण तरीही अशी पदवी, पदविका, लायसन्स, प्रमाणपत्र किंवा पुरस्कार मिळविणा-या व्यक्तीला वैद्यक व्यवसायी म्हणून आपला व्यवसाय सक्षमतेने चालविण्याच्या दृष्टीने आवश्यक ते ज्ञान व कौशल्य अवगत होत असल्याचे राज्य शासनाला, परिषदेच्या अहवालावरून किंवा अन्य प्रकारे आढळून आले तर, राज्य शासनाने, वेळोवेळी **राजपत्रात** अधिसूचना देऊन त्याद्वारे उपरोक्त अनुसूचीत सुधारणा करणे व तिच्यात अशी कोणतीही अर्हता समाविष्ट करण्याचा निदेश देणे हे, अशा अर्हतेच्या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीच्या (शर्ती असल्यास) अधीनतेने कायदेशीर असेल. अनुसूचीची दुरुस्ती.

(२) जर या अधिनियमाच्या अनुसूचीत समाविष्ट करण्यात आलेली कोणतीही पदवी, पदविका, लायसन्स, प्रमाणपत्र किंवा पुरस्कार यासाठी, कोणत्याही विद्यापीठाने, महाविद्यालयाने, मंडळाने किंवा परिसंस्थेने विहित केलेला पाठ्यक्रम किंवा परीक्षा ही, अशी अर्हता प्राप्त करणा-या व्यक्तींना वैद्यक व्यवसायी म्हणून आपला व्यवसाय कार्यक्षमरीतीने करण्यासाठी आवश्यक ते ज्ञान व कौशल्य अवगत करून देण्यासारख्या नाहीत किंवा अशा व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या प्राविण्याचा पुरेसा दर्जा राखण्यास योग्य नाहीत असे राज्य शासनास परिषदेच्या प्रतिवृत्तावरून किंवा अन्यथा कोणत्याही वेळी दिसून येईल तर, राज्य शासनाने, उक्त अनुसूचीतून अशी कोणतीही अर्हता काढून टाकण्याबाबत किंवा त्याकरिता त्यास योग्य वाटतील अशा आणखी शर्ती लादण्याबाबत वेळोवेळी निदेश देणे, हे कायदेशीर असेल :

परंतु, परिषदेशी विचारविनिमय केल्याशिवाय, राज्य शासनाने, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये अनुसूचीमध्ये सुधारणा करण्यासाठी कोणतीही अधिसूचना काढता कामा नये :

आणखी असे की, अनुसूचीतून कोणतीही पदवी, पदविका, लायसन्स, प्रमाणपत्र किंवा पुरस्कार काढून टाकण्यासाठी या कलमान्वये राज्य शासनाकडे कोणतीही शिफारस करण्यापूर्वी, परिषद ती निदेश देईल त्याप्रमाणे आणि विहित करील अशा वाजवी मुदतीत, अशी पदवी, पदविका, लायसन्स, प्रमाणपत्र किंवा पुरस्कार याच्या पाठ्यक्रमाला किंवा परीक्षांना आवश्यक तो दर्जा प्राप्त करून देण्यासाठी उपाययोजना करण्यास विद्यापीठाला, महाविद्यालयाला, मंडळाला किंवा परिसंस्थेला भाग पाडेल.

**२९.** ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव त्या त्या वेळी नोंदवहीत नोंदवण्यात आले नसेल अशा व्यक्तीने, ते अशा रीतीने नोंदविण्यात आले आहे असे खोटे अभिवेदन केले किंवा ज्यामुळे तिचे नाव अशा रीतीने नोंदविण्यात आले आहे असा समज होईल अशा त-हेने आपल्या नावाच्या किंवा किताबाच्या संबंधात कोणत्याही शब्दांचा किंवा अक्षरांचा वापर केला तर, त्यास अपराध दोषानंतर [१][ पाच हजार रुपयापर्यंत ] असू शकेल इतक्या द्रवदंडाची शिक्षा होईल. नोंदणी केलेली आहे, असे खोटे सांगितल्या-बद्दल शास्ती.

**३०.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील, असे नियम आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन असतील. नियम.

---

[१]सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) विशेष करून आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा नियमात पुढील सर्व गोष्टींची किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टीची तरतूद करता येईल :–

(अ) कलम ३ अन्वये, सदस्य, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुका ज्या वेळी, ज्या जागी व ज्या रीतीने घेण्यात येतील ती वेळ, ती जागा व ती रीत ;

(ब) कलम ८ अन्वये परिषदेच्या सभा ज्या रीतीने बोलाविण्यात व घेण्यात येतील व ज्या रीतीने त्यांचे कामकाज चालविण्यात येईल ती रीत ;

(क) कलम १० अन्वये, परिषदेचे इतर अधिकार, कर्तव्ये आणि कामे ;

(ड) कलम ११ अन्वये कार्यकारी समितीच्या सदस्यांची संख्या, त्याचा पदावधी, नैमित्तिकरीत्या रिक्त होणा-या जागा भरण्याची रीत, उक्त समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती आणि तिचे अधिकार, कर्तव्ये व कामे ;

(इ) कलम १२ अन्वये सदस्यांना द्यावयाची फी व भत्ते ;

(फ) कलम १४ अन्वये प्रबंधकास द्यावयाचे वेतन, भत्ते व त्याच्या सेवेच्या इतर शर्ती, हिशेब ठेवण्याची रीत आणि प्रबंधकाचे पर्यवेक्षणासंबंधीचे अधिकार आणि इतर कर्तव्ये व कामे ;

(ग) कलम १५ अन्वये परिषदेच्या कर्मचारीवर्गाच्या सेवेच्या इतर शर्ती ;

(ह) कलम १६ अन्वये, नोंदवहीचा नमुना, त्याची ज्या भागात विभागणी करण्यात येईल ते भाग आणि त्यात समाविष्ट करण्यात येईल असा इतर तपशील, अर्जाचे आणि सर्वसाधारण व वैयक्तिक नोटिसांचे नमुने, दोन रुपये फी भरण्याची रीत, नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;

(आय) कलम १९ अन्वये, तात्पुरत्या नोंदणीसाठी करावयाचा अर्जाचा आणि अशा नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;

(ज) कलम २० अन्वये नोंदवहीत नावातील बदल किंवा आणखी अर्हता यांची नोंद करण्यासाठी किंवा नोंदणी प्रमाणपत्राची दुसरी प्रत मिळण्यासाठी असलेली फी ;

(के) कलम २१ अन्वये नोंदणीकृत व्यवसायींच्या यादीचा नमुना, तीत समाविष्ट करावयाचा तपशील आणि ती प्रसिद्ध करण्याची रीत ;

(ल) कलम २२ अन्वये, चौकशी करण्याची रीत आणि नोंदवहीत नाव पुन्हा दाखल करण्यासाठी असलेल्या शर्ती व त्यासाठी द्यावयाची फी आणि न्यायसाहय्यकास द्यावयाचे पारिश्रमिक ;

(म) कलम २३ अन्वये नोटिसांचे आणि नोंदवहीत नावे असण्याचे चालू राहाण्यासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने ;

(न) कलम २४ अन्वये परिषद ज्या रीतीने अपिलांची सुनावणी करून त्यावर निकाल देईल ती रीत ;

(ओ) या अधिनियमात स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेल्या फी व्यतिरिक्त परिषदेस आकारता येईल अशी कोणतीही वाजवी फी ;

(प) या अधिनियमान्वये जी विहित करावयाची असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब ;

(क्यू) या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणतीही प्रयोजने पार पाडणे.

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर तो नियम अशा निर्णयाची अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून अशा सुधारलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टींच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

राज्य शासनाचे नियंत्रण.

**३१.** (१) परिषदेने किंवा तिच्या अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने या अधिनियमान्वये किंवा तदन्वये तिला किंवा त्याला देण्यात आलेले कोणतेही अधिकार चालविण्यात कसूर केली आहे किंवा अशा अधिकारांचा अतिक्रम किंवा दुरुपयोग केला आहे किंवा तिचे किंवा त्यांचे काम करण्याचे बंद झाले आहे किंवा परिषद अथवा तिचा अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष काम करण्यास असमर्थ झाला आहे असे राज्य शासनाला कोणत्याही वेळी दिसून आले तर, त्यास अशी कसूर, अतिक्रम किंवा दुरुपयोग गंभीर स्वरूपाचा आहे असे वाटल्यास त्यासंबंधीचा तपशील, यथास्थिति, परिषदेस किंवा अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास कळविता येईल, जर परिषदेने, अध्यक्षाने

किंवा उपाध्यक्षाने, राज्य शासन याबाबतीत ठरवील अशा वाजवी मुदतीत, अशी कसूर, अतिक्रम किंवा दुरुपयोग सुधारण्यात कसूर केली तर, राज्य शासनास, अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास काढून टाकण्याचा, किंवा यथास्थिति, परिषद विसर्जित करण्याचा अधिकार असेल आणि परिषद विसर्जित करण्यात आल्याच्या बाबतीत, परिषदेचे सर्व किंवा कोणतेही अधिकार, कर्तव्ये व कामे ही, त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींकडून व दोन वर्षांपेक्षा अधिक नसणा-या मुदतीपर्यंत अंमलात आणण्याचा, पार पाडण्याचा व करण्याचा अधिकार असेल व त्याने नवीन परिषदेच्या स्थापनेसाठी उपाययोजना केली पाहिजे :

[१][ परंतु, अशा प्रकारे नेमणूक केलेल्या व्यक्तींचा पदावधी राज्य शासनाला, दोन वर्षांच्या कालावधीनंतर, वेळोवेळी , एकावेळी एका वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीकरिता, त्याबाबतची कारणे लेखी नमूद करून, अशा प्रकारे वाढविता येईल की जेणेकरून एकूण कालावधी एकूणात पाच वर्षापेक्षा अधिक होणार नाही.]

(२) या अधिनियमात किंवा तद्न्वये केलेले नियम यात काहीही अंतर्भूत असले तरी, परिषदेची घटना किंवा या अधिनियमान्वये अधिकार, कर्तव्ये किंवा कामे यांपैकी कोणतेही अधिकार चालविण्यासाठी किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी किंवा कोणतीही कामे करण्यासाठी अधिकार सोपवलेल्या इतर कोणत्याही प्राधिका-याची नेमणूक ही, कायदेशीररीत्या करण्यात आलेली नाही, असे राज्य शासनास कोणत्याही वेळी आढळून आले तर, त्यास असे अधिकार, कर्तव्ये व कामे, त्यास योग्य वाटतील अशा व्यक्तींकडून व त्यास योग्य वाटतील अशा शर्तीस अधीन राहून, चालविता व पार पाडता येतील :

२००५ चा महा. ३९.

[२][परंतु आणखी असे की, पहिल्या परंतुकामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (सुधारणा) अधिनियम, २००५, **राजपत्रात** प्रसिद्ध होण्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास प्रशासकाचे पद धारण करणारी व्यक्ती, परिषद घटित केल्यानंतर, निवडून आलेल्या अध्यक्षाने आपले पद स्वीकारल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत, असा प्रशासक म्हणून पद धारण करण्याचे चालू ठेवील.]

प्रकरण-पाच

## निरसन व संक्रमणकालिन तरतुदी

**३२.** (१) या प्रकरणाच्या तरतुदीस अधीन राहून नेमलेल्या दिवशी खालील अधिनियम निरसित होतील :— निरसन व व्यावृत्ती.

१९१२ चा मुंबई ६, १९१६ चा मध्यप्रांत व व-हाड १. १३४८ फसलीचा हैद्राबाद १.

(अ) राज्याच्या मुंबई क्षेत्रास लागू असलेला, मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२.

(ब) राज्याच्या विदर्भ प्रदेशास लागू असलेला, मध्यप्रांत व व-हाड वैद्यकीय नोंदणी अधिनियम, १९१६.

(क) राज्याच्या हैदराबाद क्षेत्रास लागू असलेला वैद्यकीय नोंदणी अधिनियम.

(२) राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, पोट-कलम (१) अन्वये निरसित करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये करण्यात आलेला कोणताही नियम किंवा विनियम हा, नेमलेल्या दिवसापासून अंमलात असण्याचे बंद होईल.

(३) याप्रमाणे निरसित झालेल्या अधिनियमाखाली ठेवलेल्या किंवा चालू ठेवलेल्या ज्या नोंदवह्या नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अंमलात असतील त्या नोंदवह्या या, कलम १६ अन्वये तयार केलेल्या नोंदवह्या त्या कलमाच्या पोट-कलम (६) अन्वये अंमलात येईपर्यंत, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नोंदवह्या असल्याचे समजण्यात येईल.

(४) याप्रमाणे निरसित करण्यात आलेल्या आणि नेमलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही अधिनियमांन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, (केलेली कोणतीही नेमणूक किंवा केलेला अर्ज, काढण्यात आलेला आदेश किंवा निर्देश किंवा लादण्यात आलेली फी किंवा दिलेले प्रमाणपत्र किंवा नोटीस धरून) जेथवर ती या अधिनियमांच्या तरतुदीशी विसंगत नसेल तेथवर आणि राज्य शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, या अधिनियमांच्या, संबंधित तरतुदी अन्वये करण्यात, काढण्यात, लादण्यात आल्याचे किंवा दिलेली असल्याचे समजण्यात येईल आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टींअन्वये किंवा कृतीअन्वये तो निष्प्रभावी केला जाईतोपर्यंत व करण्यात येईतोपर्यंत, त्याप्रमाणे अंमलात राहील.

---

[१]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ याच्या कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ याच्या कलम २ अन्वये, हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

निरसित अधिनियमांखाली घटित करण्यात आलेल्या परिषदा विसर्जित करणे आणि नवीन परिषद घटित करणे.

**३३.** (१) नेमलेल्या दिवसापासून,—

(अ) राज्याच्या मुंबई क्षेत्रास लागू असलेला मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ याच्या कलम २ अ, पोट-कलम (२ अ) अन्वये घटित करण्यात आलेली वैद्यकीय परिषद; आणि

(ब) मध्यप्रांत व व-हाड वैद्यकीय नोंदणी अधिनियम, १९१६ याचे कलम ५ व मध्यप्रदेश सांविधिक संस्था (प्रादेशिक रचना) अधिनियम, १९५६ याअन्वये घटित करण्यात आलेली विदर्भ वैद्यकीय परिषद;

ही विसर्जित होईल आणि उपरिनिर्दिष्ट परिषदांचे सर्व सदस्य आपली पदे रिक्त करतील.

१९१२ चा मुंबई ६. १९१६ चा मध्यप्रांत व व-हाड अधि-नियम, १. १९५६ चा मध्यप्रांत १७.

(२) कलम ३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून नेमलेल्या दिवशी कलम ३, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने एक परिषद घटित करेल :

परंतु, राज्य शासन, उक्त पोट-कलमाच्या संबंधित खंडान्वये निवडून येण्यास पात्र असतील अशा व्यक्तींमधून उक्त पोट-कलमांचे खंड (ब), (क) व (ड) अन्वये निवडण्यात यावयाचे सदस्यसुद्धा नामनिर्दिष्ट करील.

(३) कलम ३, पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) अन्वये घटित करण्यात आलेल्या परिषदेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष हा राज्य शासनाकडून नामनिर्दिष्ट करण्यात येईल.

(४) या कलमान्वये घटित करण्यात आलेली परिषद ही, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेली परिषद असल्याचे समजण्यात येईल आणि परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य हे, कलम ४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे कालावधीपर्यंत किंवा कलम ३ च्या तरतुदींस अनुसरून, परिषद रीतसर घटित करण्यात येईतोपर्यंत या दोहोंपैकी जो कालावधी आधीचा असेल, त्या कालावधीपर्यंत पद धारण करतील :

परंतु, राज्य शासनास, उक्त तीन वर्षांचा कालावधी हा, एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक नसणा-या आणि एकंदर दोन वर्षांचा होईल इतक्या आणखी कालावधी इतका वाढवून देता येईल.

(५) पोट-कलम (२) अन्वये घटित करण्यात आलेल्या परिषदेच्या अध्यक्षाचा, उपाध्यक्षाचा किंवा सदस्याचा पदावधी संपण्यापूर्वी असा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य मृत्यू पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास काढून टाकल्यामुळे, तो निरर्ह किंवा असमर्थ झाल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे जागा रिक्त झाली तर, राज्य शासन, उक्त रिक्त जागाही, कलम ३, पोट-कलम (३) च्या संबंधित खंडाअन्वये रिक्त जागा भरण्यासाठी अर्ह असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीस नामनिर्दिष्ट करून भरेल. आणि अशा रीतीने नामनिर्दिष्ट करण्यात आलेली व्यक्ती, ती ज्याच्या जागी नामनिर्दिष्ट करण्यात आली असेल त्या सदस्यांच्या न संपलेल्या पदावधीपर्यंत, पद धारण करील.

प्रबंधकां-संबंधीची तरतूद.

**३४.** (१) (अ) मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२ याच्या कलम ५ अन्वये; आणि

(ब) मध्यप्रांत व व-हाड वैद्यकीय नोंदणी अधिनियम, १९१६ याचे कलम १० व मध्यप्रदेश सांविधिक संस्था (प्रादेशिक रचना) अधिनियम, १९५६ या अन्वये नेमणूक केलेल्या आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी पद धारण करणा-या प्रबंधकांनी, त्या दिवशी पद धारण करण्याचे बंद होईल.

१९१२ चा मुंबई ६, १९१६ चा मध्यप्रांत व व-हाड अधि-नियम, १. १९५६ चा मध्यप्रांत अधि-नियम, १७.

(२) कलम १४, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, नेमलेल्या दिवशी, राज्य शासन निश्चित करील अशा अटींवर आणि शर्तीवर प्रबंधकाची नेमणूक करील :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, प्रबंधकाच्या, त्यानंतर रिक्त होणा-या जागा, कलम १४, पोट-कलम (१) अन्वये भरण्याबाबतच्या परिषदेच्या अधिकारांस बाध येणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये ज्याचे पद धारण करण्याचे बंद झाले असेल आणि पोट-कलम (२) अन्वये प्रबंधक म्हणून ज्याची नेमणूक करण्यात आलेली नसेल अशा कोणत्याही प्रबंधकास, जर तो विसर्जित परिषदेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाला असता तर, त्याला परिषदेकडून जो भविष्यनिर्वाह निधी आणि उपदान किंवा सेवानिवृत्तीचे जे इतर लाभ मिळण्याचा हक्क प्राप्त झाला असता, तो भविष्यनिर्वाह निधी, ते उपदान व सेवानिवृत्तीचे इतर लाभ आणि परिषद राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने मंजूर करील असा कोणताही जादा लाभ असल्यास, मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, कलम ३२, पोट-कलम (१) अन्वये निरसित केलेल्या संबंधित अधिनियमान्वये किंवा तद्नुसार जर कोणताही भविष्यनिर्वाह निधी, उपदान किंवा इतर सेवानिवृत्तीचे कोणतेही लाभ देण्यासंबंधी कोणतीही तरतूद करण्यात आली नसेल तर, अशा प्रबंधकास राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन परिषद ठरवील अशी वाजवी रक्कम परिषदेकडून नुकसान भरपाई म्हणून मिळण्याचा हक्क असेल.

**३५.** या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार करण्यात आले असेल ते खेरीज करून आणि विषयात किंवा संदर्भात त्याविरुद्ध काहीही नसेल तर,— अधिकार, कर्तव्ये, इ. निहित करणे.

(१) कलम ३३ अन्वये विसर्जित करण्यात आलेल्या वैद्यकीय परिषदांचे (ज्याचा या कलमात यापुढे " विसर्जित परिषदा " असा उल्लेख करण्यात आला आहे) सर्व अधिकार नेमलेल्या दिवशी, कलम ३३ अन्वये घटित करण्यात आलेल्या परिषदेकडे (जिचा या कलमात यापुढे ' परिषद ' असा उल्लेख करण्यात आला आहे) निहित होतील.

(२) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवशी विसर्जित परिषदांकडे निहित असलेली सर्व स्थावर किंवा जंगम मालमत्ता ही, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवशी अंमलात असतील अशा सर्व निर्बंधास व अटीस अधीन राहून, परिषदेकडे निहित होईल.

(३) विसर्जित परिषदेस कोणत्याही कारणास्तव येणे असलेल्या सर्व रकमा परिषद वसूल करील आणि हा अधिनियम अंमलात आला नसता तर, विसर्जित परिषदेस जी कोणतीही उपाययोजना करता आली असती किंवा जी कोणतीही कार्यवाही दाखल करता आली असती ती उपाययोजना किंवा ती कार्यवाही करण्यास अशी परिषद सक्षम असेल;

(४) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी विसर्जित परिषदेने किंवा तिच्या वतीने घेतलेली व उक्त दिवशी अस्तित्वात असलेली सर्व कर्जे, दायित्वे आणि पत्करलेली आबंधने ही परिषद, या अधिनियमान्वये तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन घेतलेली किंवा पत्करलेली आहेत असे समजेल आणि तद्नुसार ती अंमलात असण्याचे चालू राहील;

(५) कलम ३२ अन्वये निरसित करण्यात आलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी कोणत्याही प्राधिका-यापुढे अनिर्णीत असलेले सर्व कामकाज व बाबी ह्या, या अधिनियमान्वये अशा कामकाजाची व बाबींची दखल घेण्यास सक्षम असलेल्या तत्सम प्राधिका-याकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे आणि त्याच्यापुढे चालू ठेवण्यात आल्या असल्याचे समजण्यात येईल;

(६) एखाद्या विसर्जित परिषदेने किंवा तिच्या वतीने दाखल केलेले किंवा तिच्याविरुद्ध करण्यात आलेले व नेमलेल्या दिवशी प्रलंबित असलेले सर्व खटले आणि कोणत्याही विसर्जित परिषदेने किंवा तिच्या वतीने दाखल केलेले किंवा तिच्याविरुद्ध किंवा अशा विसर्जित परिषदेचा अधिकारी म्हणून अशा परिषदेच्या कोणत्याही अधिका-यांविरुद्ध दाखल करण्यात आलेले व नेमलेल्या दिवशी प्रलंबित असलेले असे सर्व दावे व इतर कायदेविषयक कार्यवाही परिषदेकडून किंवा परिषदेच्या विरुद्ध चालू ठेवण्यात येतील.

(७) कलम ३३, पोट कलम (१) च्या खंड (अ) अन्वये विसर्जित झालेल्या वैद्यक परिषदेच्या प्रबंधकाखेरीज जे सर्व अधिकारी व कर्मचारी आणि कलम ३३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) अन्वये विसर्जित झालेल्या विदर्भ वैद्यक परिषदेच्या प्रबंधकाखेरीज जे अधिकारी व कर्मचारी नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अधिकारपद धारण करीत असतील ते; या परिषदेतील नोकरीसाठी नेमलेले अधिकारी व कर्मचारी आहेत, असे समजण्यात येईल आणि या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात येईतोपर्यंत त्यांना नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवशी जे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क होता ते वेतन व भत्ते मिळण्याचा त्यांना हक्क असेल किंवा ते सेवेच्या ज्या शर्तीच्या अथवा ज्या सेवानिवृत्ति लाभाच्या अधीन होते, त्यांस ते अधीन राहतील :

परंतु, नेमलेल्या दिवसांच्या निकटपूर्वी अशा अधिका-यांनी व कर्मचा-यांनी केलेली सेवा ही, परिषदेखाली केलेली सेवा आहे असे समजण्यात येईल :

आणखी असे की, नेमलेल्या दिवसानंतर, अशा कोणत्याही अधिका-याच्या किंवा कर्मचा-यांच्या संबंधात राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, परिषद ठरवील अशा भरपाईपोटी वाजवी रक्कम दिल्यावर त्यास सेवेतून काढून टाकण्याबाबतचा कोणताही आदेश देण्यास या खंडातील कोणत्याही मजकुरामुळे परिषदेस प्रतिबंध होतो, असे समजण्यात येणार नाही.

**३६.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्भवल्यास राज्य शासनास प्रसंगानुसार, परंतु, नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांनंतरची नसेल अशा मुदतीत आदेशाद्वारे अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

---

## अनुसूची

[ कलमे १६ (३), २७ व २८ ]

भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हतांशिवाय ज्या आणखी अर्हता धारण केल्यामुळे एखाद्या व्यक्तीस या अधिनियमान्वये नोंदणी करवून घेण्याचा हक्क प्राप्त होतो अशा अर्हता.

(१) औषधशास्त्र, शरीरविकृतिशास्त्र, शल्यचिकित्साशास्त्र, किंवा चर्मरोगशास्त्र या विषयांसाठी दिनांक १ एप्रिल, १९५४ पूर्वी देण्यात आलेली, मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाची अधिछात्रवृत्ती.

(२) औषधशास्त्र, शरीरविकृतिशास्त्र, शल्यचिकित्साशास्त्र किंवा चर्मरोगशास्त्र या विषयांखेरीज इतर कोणत्याही विषयांसाठी मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाची अधिछात्रवृत्ती.

(३) मुंबई येथील भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालयाचा सदस्य (दिनांक ३० एप्रिल, १९४४ पूर्वी प्रवेश देण्यात आलेला).

(४) पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचा १९२१ ते १९३५ या वर्षातील (दोन्ही धरुन) आयुर्विद्या विशारद.

(५) दिनांक १५ ऑगस्ट, १९४७ पूर्वीच्या बंगालच्या राज्य वैद्यकीय शाखेचा अधिछात्र आणि सदस्य.

(६) दिनांक १५ ऑगस्ट, १९४७ रोजी किंवा त्यानंतर असलेला पश्चिम बंगालच्या राज्य वैद्यकीय शाखेचा अधिछात्र आणि सदस्य.

(७) पंजाबच्या राज्य वैद्यकीय शाखेचा अधिछात्र आणि सदस्य.

(८) सन १९१२ ते १९१६ (दोन्ही धरुन) या वर्षातील (१) राष्ट्रीय वैद्यक महाविद्यालय किंवा भारताचे राष्ट्रीय भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालय, कलकत्ता याची (२) भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालय, कलकत्ता याची आणि (३) भारताचे आंतरराष्ट्रीय भिषक व शल्यचिकित्सक महाविद्यालय, कलकत्ता याची विषमचिकित्सा या विषयातील पदविका.

(९) म्हैसूर विद्यापीठाचे लायसन्स मिळालेला वैद्यक व्यवसायी.

(१०) वैद्यक, शल्यचिकित्सा आणि प्रसूतिशास्त्र या वैद्यकपद्धतीचा व्यवसाय करण्यास अर्हताप्राप्त असल्याबद्दल किंवा सैनिकी सहाय्यक शल्यचिकित्सक, रुग्णालय सहाय्यक किंवा उपसहायक शल्यचिकित्सक ह्यांची कर्तव्ये करण्यासाठी अर्हताप्राप्त असल्याबद्दल, भारतातील कोणत्याही शासनाने दिलेली पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणारी व भारतातील कोणत्याही शासकीय वैद्यक महाविद्यालयात किंवा विद्यालयात प्रशिक्षण घेतलेली कोणतीही व्यक्ती.

(११) (अ) मध्यप्रदेश वैद्यकीय परीक्षा मंडळ ; किंवा

(ब) विदर्भ वैद्यकीय परीक्षा मंडळ.

याने, वैद्यकीय आणि आरोग्य सहायकांचा पाठ्यक्रम उत्तीर्ण झाल्याबद्दल दिलेली पदविका किंवा प्रमाणपत्र.

(१२) विदर्भ वैद्यकीय परीक्षा मंडळाने वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी दिलेली पदविका.

(१३) मराठवाडा विद्यापीठाची एम. बी. बी. एस. ही पदवी.

(१४) मद्रास येथील स्टॅनले वैद्यक महाविद्यालयाची वैद्यक आणि शल्यचिकित्सा यांमधील पदविका. [ डी. एम. एस. (मद्रास) ]

[१][(१५) शिवाजी विद्यापीठाची एम. बी. बी. एस. ही पदवी ]

[२][(१६) डी. एम. पी. अर्हताप्राप्त वैद्यकीय व्यवसायीसाठी लायसन मेडीकल प्रॅक्टिशनर्स परीक्षा (नागपूर) (दोन वर्षांचा संक्षिप्त पाठ्यक्रम) ]

[३][(१७) महाराष्ट्र शासनाकडून मान्यता मिळालेली औषधशास्त्र व शल्यचिकित्साशास्त्र पदविका (ग्रामीण) [डी. एम. व एस. (ग्रामीण) ]

[४][(१८) जानेवारी, १९८९ पासून त्यापुढे अमरावती विद्यापीठ (महाराष्ट्र) यांनी मान्यता दिलेला औषधशास्त्र स्नातक व शल्यचिकित्साशास्त्र स्नातक (एम. बी. बी. एस.) ]

---

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास, आरोग्य व गृहनिर्माण विभाग क्रमांक एमएससी-१०६७-५७३०४-एच, दिनांक २७ ऑक्टोबर, १९६७ अन्वये ही नोंद दाखल करण्यात आली.

[२] शासकीय अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. एमएमसी/१०६७/६१२७६/सा.आ. ७, दि. १३ सप्टेंबर, १९७६, एमजीजी, १९७६, भाग चार-बी, पी. ११४४ अन्वये ही नोंद दाखल करण्यात आली.

[३] शासकीय अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण विभाग क्र. एमएमसी/११८४/२५०/वै.शि., दि. १६ जुलै, १९८४, एमजीजी १९८४, भाग चार-बी, पी. ९८५ अन्वये ही नोंद दाखल केली.

[४] शासकीय अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण विभाग क्र. एमएमसी/१०८९/सीआर-७७/८९-वै.शि.-८, दि. ६ जुलै, १९८९, एमजीजी, १९८९, भाग चार-बी, पी. ९७८ अन्वये ही नोंद दाखल करण्यात आली.

[1](१९) डी. ओ. एम. एस.- नेत्र औषधशास्त्र व शल्यचिकित्साशास्त्र यातील पदविका.

| | | |
|---|---|---|
| डी. डी. व्ही. | - | त्वचा व गुप्तरोग यातील पदविका. |
| डी. डी. आर. एल. | - | कर्ण व स्वरयंत्र यातील पदविका. |
| डी. ऑरथो. | - | अस्थिव्यंगोपचार पदविका |
| टी. डी. डी. | - | क्षयरोग पदविका |
| डी. पी. एम. | - | फायकोलॉजिकल औषधशास्त्र पदविका |
| डी. एम. आर. ई. | - | वैद्यकीय क्ष-किरण व इलेक्ट्रोलॉजी पदविका |
| डी. जी. पी. | - | सामान्य व्यवसाय पदविका |
| एफ. सी. पी. एस. | - | बाल आरोग्य |
| एफ. सी. पी. एस. | - | त्वचा व गुप्त रोग |
| एफ. सी. पी. एस. | - | कर्ण व स्वरयंत्र |
| एफ. सी. पी. एस. | - | बधिरीकरण |

महाराष्ट्र शासनाने असे निदेश दिले की, उपरोक्त अर्हता ही, भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६ अन्वये मान्यताप्राप्त वैद्यकीय अर्हता समजण्यात येणार नाही.]

---

[1] शासकीय अधिसूचना, वैद्यकीय शिक्षण विभाग क्र. एमएमसी/१०९६/१११/९६/अधि., दि. १९ सप्टेंबर, १९९७, एमजीजी, १९९७, भाग चार-बी, असाधारण पी. २९४ अन्वये ही नोंद दाखल करण्यात आली.